Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2020

SPECIAL ISSUE-CCLXIII (263)

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

## INDEX



| No. | Title of the PaperAuthors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील स्त्रीयांचा सामाजिक दर्जा — प्रा. सुलक्षणा किशनराव इंगोले | 1 |
| 2 | स्वराज्य जननी जिजाऊ — प्रा.डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी | 4 |
| 3 | स्त्रीवादी दृष्टीकोनातील स्त्री जाणिवाः एक अध्ययन — श्रीमती. इंदू चंद्रकांत साळुंके | 8 |
| 4 | भारतीय शास्त्रीय संगीतात स्त्रियांना सन्मान प्राप्त करून देण्यामध्ये गानहिरा हिराबाई बडोदेकरांची भूमिका — प्रा . अमोल वासुदेवराव गावंडे | 11 |
| 5 | भारतीय स्वतंत्र चळवळीतील महिलांचे योगदान. — डॉ. अब्दुलसमद बादशाह शेख | 14 |
| 6 | हैद्राबाद स्वंतत्र्यसंग्रमात महिलांचा सहभाग — प्रा. डॉ. जायभाये भगवान नाना | 18 |
| 7 | समकालीन कामकाजी महिला और उनका जीवन संघर्ष — प्रा. डॉ. कदम शिवाजी शेषराव | 21 |
| 8 | ग्रामीण स्त्रियांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक समस्या — प्रा.डॉ.शशिकांत दत्तोपंत परळकर | 26 |
| 9 | महिला सशक्तिकरण : एक प्रबन्धकीय प्रयास — Dr. Davesh Ranjan Tripathi | 31 |
| 10 | आधुनिक बाजार व्यवस्था आणि स्त्री अस्तिमांचा संघर्ष — प्रा.डॉ.शैलजा भारतराव बरुरे | 35 |
| 11 | बुध्दधम्मातील स्त्रीयांचा सामाजिक दर्जा — डॉ.बालाजी मारूती गव्हाळे | 40 |
| 12 | थेरीगाथा : स्त्रीमुक्तीचा आद्य आर्त स्वर — संध्या उद्धवराव करमनकर | 44 |
| 13 | मराठी संतसाहित्यातील स्त्रियांचे योगदान — डॉ. शारदा सा. कदम | 48 |
| 14 | सावित्रीबाई फुले यांचे धार्मिक व सामाजिक सुधारणेतील योगदान : एक अभ्यास — डॉ.रामभाऊ देवराव काशीद | 51 |
| 15 | भारतातील स्त्री जीवन (प्राचीन व मध्ययुगीन ) — राहसे दिनेश टेट्या | 54 |
| 16 | आंबेडकरपूर्व अस्पृश्य चळवळीतील सामाजिक संस्थांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास — डॉ पौळ भावना श्रीपती | 59 |
| 17 | ग्रामीण विकासात महिलानेतृत्व : समस्या व उपाय — प्रा. तेलंगे एन.एन. | 68 |
| 18 | स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान — प्रा.सिध्दार्थ टेंभूर्णे | 70 |
| 19 | इतिहासलेखन की दृष्टी से नारीवाद — डॉ.व्यास सी.पी. | 74 |

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# स्वराज्य जननी जिजाऊ

प्रा.डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी
लोकप्रशासन विभाग प्रमुख कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

भारतीय इतिहासाचा आढावा घेतला असता प्राचीन काळापासूनच महिलांच्या कर्तुत्वाची छाप पडलेली दिसून येते. 'वैदिक कालखंडात स्त्रियांना पुरुषांबरोबर शिक्षणाचा अधिकार होता. लोपामुद्रा, घोषा, विश्वतारा, अपला, गार्गी या स्त्रियांच्या नावाची नोंद ऋग्वेदात आहे.'१ गार्गी, मैत्रेयी या दोन्ही स्त्रिया तर फार हुशार होत्या. त्यांनी वाद-विवादामध्ये पुरुषांनाही मात दिली होती. 'अथर्ववेदात स्त्रीला शिक्षण मिळाले तर ती उत्तम संसार करू शकेल असे म्हटले होते'.२ एकंदरीत वैदिक काळात महिलांची स्थिती उत्तम होती, परंतु नंतरच्या काळात मनु राजाने याउलट परिस्थिती निर्माण करून स्त्रीला बंदिस्त बनविले. मनुस्मृतीमध्ये स्त्रियांवर अनेक बंधने घातली. धर्म पाप-पुण्याच्या आधारावर स्त्रियांना बंदिस्त बनवून त्यांचे अधिकार नाकारले. असे असले तरी, काही कर्तबगार स्त्रियांची उदाहरणे आहेत. त्यामध्ये रामायण व महाभारतातील कैकयी, द्रोपदी, सत्यभामा यांनी प्रशासन कार्यात मदत केल्याचा उल्लेख आढळून येतो.

राजघराण्यातील महिलांचा उल्लेख जसा इतिहासात आढळून येतो तसाच भक्ती चळवळीतील व साहित्यातील स्त्रियांमध्ये महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, मिराबाई, अक्क महादेवी, जनाबाई यांचा उल्लेख दिसून येतो. तसेच मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम राजवटीमध्ये सुद्धा काही महिलांनी राजकारणावर आपली छाप पडलेली आहे. तसेच शिवशाहीतील राजघराण्यातील स्त्रियांचा राजकारणामध्ये मोलाचा वाटा होता. शिवशाहीची निर्मितीच मुळात एका कणखर स्त्रीच्या इच्छांची पूर्तता आहे. ती स्त्री म्हणजे स्वराज्य जननी जिजाऊ होय.

संशोधन पद्धती

तथ्य संकलन:- प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुयम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिक व इंटरनेट वरील माहितीचा समावेश आहे.

* शोधनिबंधाचा उद्देश:-१. राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या उज्वल कर्तव्याचा आढावा घेणे.

२. वर्तमान स्थितीत राष्ट्रमाता जिजाऊंच्या गुणवैशिष्ट्यांचे महत्त्व स्पष्ट करणे.

महाराष्ट्राच्या इतिहासातील एक प्रभावी व सामर्थ्यशाली व्यक्तिमत्व म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब यांना जगात सर्वत्र ओळखले जाते. जिजाऊंनी महाराष्ट्रामध्ये दोन महायोद्धाना घडवण्याचे महान कार्य करून महाराष्ट्रातील मृत शरीरात फुंकर टाकून नवचैतन्य निर्माण केले. जिजाऊंच्या समोर ,येथील भूमिपुत्रांना मिळणारी गुलामगिरीची वागणूक, मुलीबाळांचा व स्त्रियाचा होणारा व्यापार, त्यांच्यावर होणारा अन्याय त्यांना पाहावत नव्हता. जिजाऊंना त्यांच्यामधील बंडखोर आणि अन्यायाला प्रतिकार करणारी शक्ती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. जिजाऊ एका महान कर्तृत्ववान कुटुंबात जन्माला आल्या. त्यांना जन्मजात काही क्षमता प्राप्त झाल्या होत्या. त्यांना लहानपणापासूनच घोडेस्वारी, तलवारबाजी आणि अभ्यासामध्ये आवड होती.

'Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

त्यांचे पिता लखुजी जाधव यांनी त्यांना चांगले ओळखले होते. त्यांच्या वागण्या बोलण्यातील धिपणा व बुद्धिमत्ता त्यांना स्पष्ट संकेत देत असे की, ही पोर पुढे जाऊन नक्कीच काहीतरी विलक्षण करणार याची त्यांना खात्री होती. त्यांचा हा विश्वास जिजाऊनी सत्यात उतरवला आणि बाळ शिवबाच्या माध्यमातून महाराष्ट्रात मराठ्यांचे स्वराज्य निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या.

लखुजीराजे जाधव यांनी आपल्या जिजाऊचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी करून दिला. पुढे तत्कालीन मुस्लिम राजवटीने या दोन्ही कुटुंबात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला. दोघांनाही युद्धासाठी एकमेका समोर उभे करण्याचा प्रयत्न केला. परंतु लखुजीराजे जाधव यांनी अत्यंत हुशारीने राजकारणाचे डावपेच खेळले. परंतु जिजाऊंचे पिता लखुजीराजे व त्यांच्या बंधूंना निजामाने विश्वासघाताने मारले .शिवाय शहाजीराजे भोसले व जाधव यांच्यात वैरभाव निर्माण करून जिजाऊंच्या माहेरच्या लोकांना त्यांच्यापासून दूर केले. या सर्व गोष्टींचा जिजाऊंच्या मनावर आघात झाला होता. तसेच जिजाऊंना होणारा अन्याय सहन होत नव्हता. त्यात निजामशाही ,आदिलशाही व मोगल या मुस्लीम राजवटी भारतात मूळ रहिवाशी असलेल्या जनतेवर खूप मोठ्या प्रमाणावर अन्याय, अत्याचार करून त्यांना गुलामीची वागणूक दिली जात होती. ही बाब जिजाऊंना स्वस्थ बसू देत नव्हती. तसेच शहाजीराजे भोसले यांनाही आपले स्वतःचे स्वराज्य असावे. ज्यामध्ये सर्व जनता आनंदाने राहील असे वाटत होते. जनतेच्या हितासाठी जिजाऊ व शहाजीराजे भोसले यांनी आपले सर्वस्व अर्पण करण्याची तयारी केली. मराठा राज्याच्या निर्मितीसाठी जिजाऊंना शिवबासोबत पुण्यात ठेवण्याचा निर्णय घेतला. आपल्या सर्व सुखांचा त्याग केला. शहाजीराजांनी व जिजाऊंनी यासाठी आपल्या मुलांचा जीव कवडीमोल समजून जनकल्याणाचा लोक हिताचा संकल्प केला . जिजाऊंनी शिवबाला हीच शिकवण देऊन ,आपण रयतेसाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याची शिकवण दिली .यातूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली . जिजाऊंनी केवळ आपल्या मुलावर संस्कार केले असे नव्हे, तर आपल्या राज्याच्या निर्मितीसाठी पुणे परिसरातील सर्व लोकांच्या मनात स्वराज्याचा विचार रूजवला. पुणे जागिरीमधील मुलाबाळांमध्येही हा विचार विकसित करण्यात त्या यशस्वी ठरल्या. जिजाऊंच्या विचारामुळे पुणे परिसरामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. मुली व स्त्रियां जिजाऊंच्या कर्तृत्वामुळे प्रेरीत झाल्या. जिजाऊंनी पुणे जहागिरीतील लोकांच्या मनामध्ये आत्मसन्मान जागृत करून सर्वांना एकत्रित करण्यात यशस्वी ठरल्या.

'मुत्सद्दी ,धडाडी, कणखरपणा ,धैर्य, निःपक्षपाती न्यायदान, कर्तव्यकठोर स्वभाव, प्रजेबद्दलचे ममत्व, हिंदु धर्मावरील गाढ श्रद्धा, स्त्रियांच्या बेअब्रूची असलेली चीड या सार्‍या गोष्टी शिवरायांच्या मनावर परिणाम करणार्‍या ठरल्या. यातूनच खंबीर असे छत्रपती शिवाजी महाराज घडले.

जिजाऊंनी त्यांच्याजवळ असलेल्या पुण्याच्या जहागिरीतील केवळ ३६ खेड्यांच्या मदतीवर स्वराज्य निर्मितीची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी अवघ्या स्वराज्यातील प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यावर मायेचा हात ठेवला.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनी अनेक संकटांचा सामना करण्यासाठी स्वतः पाठवले. आपल्या मुलाचे काही बरेवाईट होईल याची कधीच भीड ठेवली नाही. 'आता नाही तर कधीच नाही' या उक्तीनुसार मोठमोठ्या संकटांना सामोरे जाण्याचे धाडस त्यांनी शिवरायांमध्ये निर्माण केले. प्रसंगी कठोर झाल्या, म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज घडले. खऱ्या अर्थाने जिजाऊंच्या संस्कारांमध्ये निर्माण झालेले स्वराज्य हे सुराज्य होते. कारण छत्रपतींच्या काळात येथील सर्वसामान्य जनतेलाही न्याय मिळत होता. स्वराज्यात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सन्मान मिळत होता. कल्याणकारी राज्य कसे असावे ? याचे उत्तम उदाहरण म्हणजे जिजाऊंच्या संस्कारात निर्माण झालेले स्वराज्य होय. राष्ट्रमाता जिजाऊ यांनी केलेले कार्य न भूतो न भविष्यती अशा स्वरूपाचे होते. म्हणूनच त्यांच्याविषयी इतिहासकारांनी अभिप्राय दिला आहे.

गो.स.सरदेसाई त्यांच्या मते "शिवाजीला योग्य ते प्रोत्साहन देऊन त्यांच्याकडून मराठ्यांचे स्वराज्य स्थापण्याची इच्छा जिजाबाईने पूर्ण करून घेतली. नानाविध विपत्ति सहन करून जो हा सुयोग तिने घडून आणला त्यामुळे महाराष्ट्राचा भाग्योदय झाला".३ सरदेसाई या इतिहासकारांनी जिजाऊंचे कार्य व सहनशीलता यांचा उल्लेख केला आहे. भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्यामते "शिवाजी महाराजांची मातृभक्ती विलक्षण होती. सुदैवाने जिजाऊ सारखी पूज्य, निःस्पृह, करारी, सद्गुणी अशी त्यास मातोश्री लाभली होती. तिची भक्ती ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला व कोणतीही गोष्ट तिला विचारल्याशिवाय केली नाही".४ वैद्य यांनी जिजाऊंचे गुणवैशिष्ट्य सांगत असतानाच छत्रपती शिवाजी महाराजांची मातृभक्ती स्पष्ट केलेली आहे.

राष्ट्रमाता जिजाऊंनी केवळ छत्रपती शिवरायांना सल्ला देणे व मार्गदर्शन करणे एवढेच कार्य केले नाही, तर जेव्हा शिवाजी महाराज मोहिमेवर जात असत, तेव्हा राज्य कारभार पाहणे ,योग्य तो निर्णय घेणे ही जबाबदारीही अत्यंत प्रभावीपणे जिजाऊंनी पार पाडली आहे. संभाजीराजांवरही जिजाऊंचा प्रभाव होता. संभाजीराजांना त्यांनी आईचे प्रेम दिले. त्यांच्यावरती संस्कार केले. यामुळेच छत्रपती संभाजी महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला.

राष्ट्रमाता जिजाऊ या धर्मनिष्ठ होत्या परंतु अंधश्रद्धा बाळगणाऱ्या नव्हत्या. त्यांनी निर्णय देत असताना अनेकवेळा धर्मातील अयोग्य विचारांना दूर करण्याचा प्रयत्न केला. सर्वांना समान वागणूक हा त्यांचा न्याय होता. कोणावरतीही अन्याय होणार नाही याची विशेष काळजी घेण्याची शिकवण त्यांनी शिवरायांना दिली. यामुळे एका उत्तम राज्याचा उदय महाराष्ट्रात होऊ शकला. आजही जिजाऊ व शिवरायांच्या विचारसरणीचा स्वीकार करून राज्यकारभार केला तर जगात भारतास आदर्श देश व महासत्ता म्हणून उदयास येण्यास वेळ लागणार नाही.

संदर्भसूची

१.डॉ. एस.एस.गाठाळ- भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै २०१३,पृ.क्र.१२.

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

२.डॉ. एस.एस.गाठाळ- भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै २०१३,पृ.क्र.१२.

३.डॉ. एस.एस.गाठाळ- भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै २०१३,पृ.क्र.६३.

.डॉ. एस.एस.गाठाळ- भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै २०१३,पृ.क्र.६३.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani